# नाशिक महानगरपालिका, नाशिक
# झोपडपट्टी सुधारणा निर्मुलन विभाग
## कोटेशन नोटीस

---

नाशिक महानगरपालिकेस खालील तक्त्यात नमुद केलेले काम करणेकामी अनुभवी व्यावसायीकांकडुन कोटेशन मागविण्यात येत आहे.

| अ. क्र. | तपशिल | अंदाजे प्राकलन |
|---|---|---|
| १) | झोपडपट्टी सुधारणा निर्मुलन विभागाने मागविलेल्या निविदांचे सॉफ्टकॉपीवरुन ए-४ साईजमध्ये प्रिंटींग काढणे व स्पायलर बाईंडींग करुन पुरविणे | ४५००/- |

**अटी/शर्ती**

१)वरील कामाचे कोटेशन पत्रक (अटीशर्तीसह) www.nashikcorporation.in या संकेत स्थळावर दिनांक १२/०७/२०१६ ते दिनांक १६/०७/२०१६ रोजी दुपारी १.०० वाजेपर्यंत या कालावधीत उपलब्ध आहे.

२)कोटेशन पाकिट सादरीकरणाची अंतीम मुदत दिनांक १६/०७/२०१६ रोजी दुपारी ४.०० वाजेर्पंत राहील. मुदतीनंतर प्राप्त झालेले कोटेशन पाकिट स्विकारले जाणार नाही.

३)सदरचे साहित्य नाशिक महानगरपालिका मुख्यालय किंवा आदेशात नमुद केल्याठिकाणी पोहोच करावे लागेल. त्यासाठी वेगळा वाहतुक खर्च देण्यात येणार नाही.

४)सदरचे दरपत्रकात सर्व करासह दर नमुद करावयाचे आहेत. कोणत्याही कराची जबाबदारी नाशिक महानगरपालिकेवर राहणार नाही.

५)कोणतेही कोटेशन स्विकारणे अगर नाकारण्याचा अधिकार निम्नस्वाक्षरीकार यांचा राहील.

Sd/-
**उपआयुक्त(अति.)**
**नाशिक महानगरपालिका, नाशिक**

.....................................................................................................................

# नाशिक महानगरपालिका, नाशिक

झोपडपट्टी सुधारणा निर्मुलन विभाग: कोटेशन फॉर्म २०१६

**कामाचे नांव** : नाशिक महानगरपालिकेच्या झोपडपट्टी सुधारणा निर्मुलन विभागातील निविदांचे सॉफ्टकॉपीमधील दस्तऐवजांची प्रिंट काढणे व स्पायलर बाईंडींग करुन फाईल्स तयार करुन पुरविणे.

**कामाची मुदत : ०३ दिवस.**

**कोटेशन सादर करण्याची अंतिम मुदत** : दिनांक १४/०७/२०१६ रोजी दुपारी ४.०० वाजेपर्यंत.

**कोटेशनधारकाचे नांव व पत्ता** : ------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------

**संपर्क क्रमांक** :

उपरोक्तप्रमाणे कामाचे अटीशर्ती व स्पेशिफिकेशननूसार काम करणेसाठी मी/आम्ही पुढीलप्रमाणे सर्व करांसह दर सादर करीत आहोत.

| अ. क्र. | तपशिल | दर सर्व करासह रक्कम रुपये | प्रमाण/एकक | शेरा |
|---|---|---|---|---|
| १) | झोपडपट्टी सुधारणा निर्मुलन विभागाने मागविलेल्या निविदांचे सॉफ्टकॉपीवरुन ए-४ साईजमध्ये प्रिंटींग काढणे. | | प्रति कॉपीसाठी | |
| २) | स्पायलर बाईंडींग करुन पुरविणे | | प्रति नग | |

सदर कोटेशनसोबत असलेल्या सर्व अटी व शर्ती मी वाचले असुन मला त्या मान्य आहेत. सदर अटी शर्ती प्रमाणे सदर कोटेशनमध्ये नमुद केलेल्या दराने १२ महिने कालावधीकरीता पुरवठा करण्यास मी तयार आहे. त्यासाठी या कोटेशनवर स्वाक्षरी करीत आहे.

**निविदाधारकाची सही व शिक्का**

## नाशिक महानगरपालिका, नाशिक
## झोपडपट्टी सुधारणा निर्मुलन विभाग
## सर्वसाधारण अटी शर्ती (कोटेशन)

०१) कोटेशन सोबतची कोटेशनधारकाची कोणतीही अट मान्य करता येणार नाही. सशर्त कोटेशन तात्काळ रद्द करण्यात येईल.

०२) कोटेशन नोटीस मध्ये नमुद केलेली संख्या ही अंदाजे असुन त्या मध्ये कमी जास्त होण्याची शक्यता आहे.

०३) दिलेल्या मुदतीमध्ये संपुर्ण मालाचा पुरवठा करणे/काम करणे/सेवा पुरविणे आवश्यक आहे. काही अपरिहार्य कारणास्तव मालाचा पुरवठा करणे शक्य नसल्यास तशी मुदतवाढ मिळणेबाबतचा आगाऊ अर्ज करणे आवश्यक राहील. तथापी मुदतवाढ द्यावयाची किंवा कशी या बाबत महापालिकेचा निर्णय अंतीम राहील.

०४) ज्यांची संपुर्ण किंवा भागशः कोटेशन दर मंजुर होईल त्या कोटेशनधारकास महानगरपालिकेचे लाभात र.रु.१२०/- चे जनरल स्टॅम्पपेपर वर रितसर करारनामा करुन द्यावा लागेल. तसेच एक सक्षम जामीनदार द्यावा लागेल.

०५) सेल्स टॅक्स, वाहतूक खर्च व इतर सर्व करांसह कोटेशन दर नमूद करावयाचे आहेत. कोणत्याही टॅक्सची जबाबदारी महानगरपालिकेवर राहणार नाही.

०६) मुदतीत मालाचा पुरवठा न केल्यास/काम न केल्यास/सेवा न पुरविल्यास अशा उशिरा प्राप्त झालेल्या मालावर/केलेल्या कामावर/सेवा पुरविण्याच्या रक्कमेवर दर हजारी दर दिवसाला रु.१/- या प्रमाणे दंड आकारणी करण्यात येईल व सदरची रक्कम कोटेशनधारकाकडून वसुल करण्यात येईल.

०७) सदरचे मंजूर दराने कराराचे मुदतीपर्यंत वेळोवेळी गरजेनूसार पुरवठा करणे बंधनकारक राहील.

०८) एकुण बिलाच्या रक्कमेतून कामाचे स्वरुप विचारात घेता आवश्यकतेनूसार ५ टक्के सुरक्षा अनामत रक्कम कपात करण्यात येईल. मालाचा पुरवठा झाल्यानंतर सहा महिन्यापर्यंत मालाच्या दर्जाबाबत काही तक्रार न आल्यास मागणीनूसार सदरची रक्कम परत करण्यात येईल.

०९) मुदतीत मालाचा पुरवठा न झाल्यास/मुदतीत काम पुर्ण न केल्यास सदरचा माल/काम कोटेशनधारकाचे जबाबदारीवर इतर ठिकाणाहून करुन घेण्यात येईल. आणि त्या खरेदीस महानगरपालिकेस मंजूर दरापेक्षा जास्त खर्च आल्यास तो कोटेशनधारकाकडून वसुल करण्यात येईल.

१०) मंजूर नमुन्याप्रमाणे/स्पेशिफिकेशनप्रमाणे मालाचा पुरवठा न झाल्यास/काम न झाल्यास सदरचा माल परत करण्यात येईल अथवा सेवा नाकारण्यात येईल व त्याबाबतचा महानगरपालिकेचा निर्णय अंतिम राहील.

११) कोणताही माल मंजूर केलेल्या दराने कोटेशनधारकाकडून खरेदी करण्याची महानगरपालिकेवर सक्ती नाही व याबाबत कोटेशनधारकास नुकसान भरपाई मागता येणार नाही.

१२) अटी/शर्तीमधील एखाद्या शर्तीबाबत काही सवलत देणे अथवा आवश्यक अशा काही जादा अटी घालण्याबाबत महानगरपालिकेस अधिकार राहील.

१३) कोटेशन दर मंजूर झालेनंतर सदरच्या मालाच्या दरात/कामाच्या दरात/सेवेच्या दरात काही वाढ झाल्यास वाढलेल्या दराप्रमाणे कोटेशनधारकास जादा पैसे मिळणार नाही.

१३) पुरवठाधारकाने अटीशर्तीचा भंग केल्यास त्यांचे बिलातून रक्कम जप्त करण्यात येईल.

Sd/-
**उपआयुक्त(अति.)**
**नाशिक महानगरपालिका, नाशिक**

सदरचे अटीशर्ती मी वाचल्या असून सदरच्या अटीशर्ती मला मान्य व कबूल असून त्याप्रमाणे माल पुरविण्यास/सेवा पुरविण्यास/काम करण्यास मी तयार आहे. त्यासाठी स्वाक्षरी करत आहे.

**कोटेशनधारकाची सही व शिक्का**